**प्रेस नोट** **दि.०१/०८/२०१९**

## समर्थ पोलिस स्टेशन

## शासकिय जमिनीचा अपहार करणाऱ्या आरोपीस अटक

समर्थ पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नंबर २४१/२०१७ भा.द.वि.क. ४२०, ४६७, ४७१, १२०(ब) व ३४ प्रमाणे दिनांक-१४/१२/२०१७ रोजी दाखल आहे. सदर गुन्ह्यात दिनांक- ३१/०७/२०१९ रोजी बळीराम खंडुजी कड (तत्कालीन मंडल अधिकारी रांजणगांव गणपती शिरुर) यांस त्यांचा गुन्ह्यातील सहभाग निश्चित झालेनंतर १७/२० वाजता अटक करणेत आली असुन त्याची मा. श्री. केळकर साो. प्रथमवर्ग न्यायदंधिकारी साो. पुणे यांनी दि. ०३/०८/२०१९ रोजी पर्यंतची पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली आहे. आरोपी बळीराम कड याने अटकपुर्व जामीन मिळणेकरीता मा. सत्र न्यायालय पुणे त्यानंतर मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडे धाव घेतली होती परंतु मा. सत्र न्यायालय पुणे व त्यानंतर मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी प्रकरणाची गंभीरता लक्षात घेवुन आरोपीचा अटकपुर्व जामीन नाकारला होता.

या गुन्ह्यात आरोपीत मजकुर यांनी आपसात संगनमत करुन गुन्हेगारी स्वरुपाचे कटकारस्थान करुन जिल्हा पुनर्वसन अधिका-यांचे कार्यालयातील लिपीक पाहीजे असलेला आरोपी चंद्रशेखर मुरलीधर ढवळे याने बनावट आदेश बनवीले. ते आदेश बनावट आहेत हे माहीत असुनही ते खरे आहेत असे दर्शवून आरोपी सुभाष कारभारी नळकांडे, रा.बुरुंजवाडी, ता.शिरुर (अटक दिनांक-०१/१०/२०१८) याने त्याचा वापर केला. त्या आदेशांवरुन प्रकल्पग्रस्त शेतक-याचे नावे शिरुर तहसिल कार्यालयातील तत्कालीन पुनर्वसन लिपीक रमेश वाल्मिकी (अटक ता. ०२/०३/२०१९ रोजी) याने खोटे अर्ज तयार केले. त्यावर कारवाई बाबतचे अधिकारक्षेत्र नसतानाही आरोपी तत्कालीन नायब तहसिलदार श्रीमती गरड यांचे शेरे मारले. त्या आधारे शासकीय जमीनीचे प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या नावे गावकामगार तलाठी मौजे कासारी सचीन देवप्पा काळेल (अटक दि.२७/१२/२०१८) यांनी फेरफार रजीस्टरी नोंदी घेतल्या. त्या नोंदी तत्कालीन मंडल अधिकारी अटक आरोपी नामे बळीराम खंडुजी कड, रा.शिक्रापूर, ता.शिरुर यांनी कायदेशीरबाबी किंवा कागदपत्र न तपासता व त्याबाबत कोणतीही खातरजमा न करता प्रमाणीत केल्या.

त्यानंतर पुन्हा प्रकल्पग्रस्त शेतक-यांचे खोटा अर्ज तयार करुन आरोपींनी शासन प्रदान जमीनींचा भोगवटा वर्ग बदलण्यासाठी हे अधिकार उपजिल्हाधीकारी किंवा त्यांच्या वरीष्ठांना असतानाही याबाबतचे अर्ज शिरुर तहसील कार्यालयात दाखल केले. त्या सर्व अर्जांवर यातील आरोपी तत्कालीन नायब तहसिलदार श्रीमती गरड यांनी हेतुतः शेरे मारले. त्याआधारे शासकीय जमीनीचे प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या नावे झालेल्या जमीनींचे भोगवटा वर्ग बदलाचे गावकामगार तलाठी मौजे कासारी काळेल यांनी फेर फार रजीस्टरी नोंद केले. त्या नोंदी तत्कालीन मंडल अधिकारी अटक आरोपी नामे बळीराम खंडुजी कड यांनी कोणत्याही बाबींची खात्री किंवा पडताळणी न करता प्रमाणीत केल्या. या प्रकरणांमधील अर्ज व त्या सोबतचे कागदपत्र हे सक्रुतदर्शनीच बनावट व बेकायदेशीर असतानाही हेतुतः त्याकडे सर्वांनी दुर्लक्ष केलेले आहे.

त्यामुळे त्या शासकीय जमीनींचे हस्तांतरण झाल्यानंतर त्यांचा भोगवटा वर्ग बदलला गेलेमुळे त्या जमीनींच्या विक्रीसंदर्भात जे शासकीय निर्बंध आहेत तेही बनावट आदेशांच्या आधारे डावलले गेले आहेत. अशा जमीनी पुन्हा सर्व सामान्यांना विक्री केल्या गेल्या आहेत. त्यामुळे एकीकडे शासनाची व दुसरीकडे गोरगरीब जनसामान्यांची अशी दुहेरी फसवणुक झालेली आहे.

- प्रस्तृत प्रकरणी झालेली अनियमितता लक्षात आलेनंतर जिल्हा पुनवर्सन अधिकारी कार्यालयाकडुन मार्च २०१५ मध्ये दोषींविरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा नोंद करण्याचे आदेश पारित करण्यात आलेले आहेत. तथापी आज अखेर त्यावर कार्यवाही झालेली नाही.
- यातील आरोपी नामे रमेश वाल्मिकी याचा **मा. सत्र न्यायालय पुणे, मा. उच्च न्यायालय मुंबई तसेच मा. सर्वोच्च न्यायालय दिल्ली** यांनी प्रकरणाची गंभीरता समजुन त्याचा अटकपुर्व जामीन नाकारला होता. त्यांस दि. ०२/०३/२०१९ रोजी १८/३० वा. अटक करण्यात आलेली आहे.

गुन्ह्याचा अधिक तपास मा.पोलीस उपायुक्त, परि.-१,श्री.स्वप्ना गोरे मॅडम, सहा.पोलीस आयुक्त, फरासखाना विभाग, श्री.प्रदिप आफळे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण कदम, पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री. विनायक साळुंखे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक प्रभाकर कापुरे हे करीत आहेत.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक<br>समर्थ पोलीस स्टेशन पुणे